## समाजभूषण बाबूराव उर्फ अप्पासाहेब जेधे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पुणे २

प्रथम सत्रांत परिक्षा - २०१३-१४

विषय - मराठी : पाठ्यपुस्तके - मराठी विनोदी कथा — वेळ - २ तास

प्रथम वर्ष कला — व्यावहारिक व उपयोजित मराठी — गुण ६०

---

**प्र.१ खालील प्रश्नांची उत्तरे २० शब्दांत लिहा. (कोणतेही १०)** — १०

१) हास्य किंवा विनोदामुळे मानवी जीवनावर कोणता चांगला परिणाम होतो?
२) लेखनात कोणत्या कारणांमुळे विनोद निर्मिती होते?
३) लेखकाने मिठाईचे दुकान का सुरू केले?
४) राम गणेश गडकरी यांनी कोणत्या टोपण नावाने विनोदी लेखन केले?
५) चि. वि. जोशी यांनी आपल्याला वक्तृत्व कला प्राप्त न होण्याची कोणती दोन कारणे सांगितली आहेत?
६) पहिले कावळे संमेलन कुठे भरले होते?
७) पु.ल. देशपांडे यांची एस.टी. करकचून ब्रेक मारून का थांबली?
८) बंड्याच्या बाने लेखकाकडे कोणती तक्रार केली?
९) नागु गवळीचा आवडता विषय कोणता होता?
१०) मुकुंद टाकसाळे यांच्या लेखन शैलीची दोन वैशिष्ट्ये सांगा.
११) 'पेज थ्री' म्हणजे काय?
१२) 'बंडू आणि अमेरिकेची कान उघडणी' या कथेतील पात्रांची नावे सांगा.

**प्र.२ खालील प्रश्नांची उत्तरे ५० शब्दात लिहा. (कोणतेही दोन)** — ०८

१) वर्तमानपत्रकर्त्याला मिठाईचे दुकान कोणत्या गोष्टीमुळे फायदेशीर ठरते?
२) टीप लिहा : नाटकाची प्रस्तावना
३) 'झोप' या कथेतील नागु गवळीचे व्यक्तिचित्र रेखाटा
४) व्यक्तिरेखा स्पष्ट करा - केसोपंत कावळे

**प्र.३ खालील प्रश्नांची उत्तरे १५० शब्दात लिहा. (कोणतेही दोन)** — १२

१) नाटक लिहिण्यासाठी कोणत्या गोष्टींची तयारी करावी असे लेखक उपरोधाने म्हणतो?
२) चि. वि. जोशी यांना लाकूड पेठ व्यापारी मंडळाच्या भाषणात कोणता अनुभव आला?
३) टीप लिहा : पहिले कावळे संमेलन
४) 'पेज थ्री' या कथेतील मेंगाळेकाकूंची व्यक्तीरेखा कथेच्या आधारे स्पष्ट करा.

**प्र.४ खालील प्रश्नांची उत्तरे ३०० शब्दात लिहा. (कोणतेही एक)** — १०

१) एक विनोदी कथा म्हणून 'म्हैस' या कथेचे परीक्षण करा.
२) बंडू आणि अमेरिकेची कानउघडणी या गंगाधर गाडगीळांच्या कथेचे कथानक कथेच्या वैशिष्ट्यांसह स्पष्ट करा.

### व्यावहारिक व उपयोजित मराठी

**प्र. ५ (अ) खालील प्रश्नांची उत्तरे ५० शब्दात लिहा. (कोणतेही एक)** — ०४

१) व्यक्तिमत्व विकासाचे स्वरूप स्पष्ट करा.
२) व्यक्तिमत्त्व विकासावर परिणाम करणारे घटक स्पष्ट करा.

**(ब) खालील प्रश्नांची उत्तरे ५० शब्दात लिहा. (कोणतेही दोन)** — ०८

१) श्रवण कौशल्याचे स्वरूप स्पष्ट करून श्रवणातील अडथळे सांगा.
२) वाचन कौशल्य म्हणजे काय? वाचनाचे प्रकार सांगा.
३) संभाषण कौशल्याचे स्वरूप स्पष्ट करा.
४) लेखन कौशल्ये आत्मसात करण्यासाठी कोणत्या गोष्टींची आवश्यकता असते?

**(क) खालील प्रश्नांची उत्तरे ५० शब्दात लिहा. (कोणतेही दोन )** — ०८

१) सूत्रसंचालन म्हणजे काय? सूत्रसंचालनाचे स्वरूप स्पष्ट करा.
२) कार्यक्रम संयोजन कौशल्याचे स्वरूप स्पष्ट करा.
३) उत्तम सूत्रसंचालनासाठी कोणत्या गोष्टींची आवश्यकता असते?
४) टीप लिहा - कार्यक्रमाची परिभाषा

***